# संपुर्ण दारुबंदी आंदोलन
# ..हवाय आपला सहभाग

सप्रेम नमस्ते !

होय! संपुर्ण दारुबंदी शक्य आहे.लोकशाहीत जनतेची तीव्र ईच्छाशक्ती असल्यास लोककल्याणकारी शासनास निर्णय घ्यावाच लागेल.भारतीय राज्यघटनेतील कलम 47 (4) या मार्गदर्शक तत्वानुसार नशाबंदीबाबतचे निर्णय घेण्याचे सूचना व आधिकार प्रत्येक राज्यशासनास दिलेले आहेत.त्यानुसार महाराष्ट्रात हा निर्णय व्हावा अशी अपेक्षा आहे.राज्यकर्त्यांवर लोकशक्तीचा नैतीक दबाव आल्यास संपुर्णं दारुबंदी होऊ शकते. गरज आहे ती फक्त जनआंदोलन व लोकचळवळीची. आपण या चळवळीत सामील व्हावे.

## *दारुबंदी का करावी?*

- ❖ दारु ती दारुच ती वैध असो की अवैध दोन्हीमुळे नशा येतेच. त्यामुळे दारुला राजमान्यता वा राजाश्रय नसावा.

- ❖ मनुष्याची वैचारिक, शारिरीक व मानसिक हानी प्रचंड होते.आरोग्यास घातक.
- ❖ कुटुंब सर्वार्थाने उध्वस्त होत राहते. व दुसऱ्या बाजुला 'मद्यसम्राट' गब्बर होतात.
- ❖ कुटुंबातील व समाजातील महिला व तरुणीना शारिरीक व मानसिक त्रास नाहक सहन करावा लागतो.
- ❖ कोणताही गुन्हा करणे (उदा. विनयभंग, बलात्कार, खून, मारामाऱ्या, सर्व प्रकराचे अपघात)दारुच्या नशेशिवाय गुन्हेगारास सहसा शक्य होत नाही.याचे प्रमाण एकूण गुन्हेगारापैकी 50 % ते 60 % आहे.
- ❖ पती-पत्नीच्या एकूण घटस्फोट प्रकरणांपैकी 35% प्रमाणात दारू हेच कारण आहे.
- ❖ गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, निरनिराळ्या जयंत्या, यात्रा, वैयक्तीक कार्यक्रमात दारुचा होणारा बेसुमार वापर यामुळे सांस्कृतीक प्रचंड हानी होते.
- ❖ युवापिढीची नैतीक व वैचारीक प्रचंड हानी होत राहते.परिणामी, राष्ट्रबांधणीच्या काळात दारु (मद्य) हा अडसर आहे.
- ❖ स्वातंत्र्यपुर्व काळात दारु पिणाऱ्याचे प्रमाण हे 5% होते.ते आज जवळजवळ 30% आहे.

❖ प्रत्येक निवडणुकीत दारुचा बेसुमार वापर होऊन सध्या दारु हे निवडणुका जिंकण्याचे साधन बनले आहे.परिणामी अपप्रवृत्तीची मंडळी निर्णय प्रक्रियेत जात आहेत.

❖ दारुला जगातील कोणत्याही धर्मात आजिबात स्थान नाही, दारु किंवा नशा करणे हे धर्मविरोधी कृत्य आहे.

❖ शासनाच्या म. गांधी तंटामुक्त गांव मोहिमेतील वैध- अवैध दारु हा प्रमुख अडसर आहे.

❖ महाराष्ट्रातील सर्व संतानी व लो. टिळक, म.गांधी, म.फुले, डॉ. आंबेडकर या महापुरुषानी संपुर्ण दारुबंदीचे स्वप्न पाहीले होते.व त्या करताही ब्रिटिश राजवटीत जोरदार प्रयत्न केले होते.

## *या आंदोलनात आपला सहभाग मिळावा*

1. या चळवळीसाठी आपण समयदान द्यावे व ते शक्य नसल्यास अर्थदान द्यावे.
2. संपुर्ण दारुबंदीबाबत सर्वत्र सतत जाहीरपणॆ स्पष्ट बोलत राहावे.
3. दर आठवड्याला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, गृहमंत्री तसेच राज्यपाल, देशाचे राष्ट्रपती व पंतप्रधान याना नियमीतपणे ई- मेल, पोस्टकार्ड, किंवा अन्य पत्राद्वारे राज्यात वैध वा अवैध संपुर्ण दारुबंदीची मागणी करत राहावी.
4. सर्व वृतपत्राना व अन्य प्रसिद्धी माध्यमाना आपल्या प्रतिक्रीया व दारुबंदीबाबतचे लेखन कळवावे.
5. आपल्या परिसरातील ग्रामपंचायत, पंचायत समिती, नगरपालिका जिल्हापरिषद व महानगरपालीका, याना संपुर्ण दारुबंदीबाबतचा ठराव करण्याचा आग्रह धरावा.त्या ठरावाच्या प्रती युक्रांद कार्यालयाकडे पाठवाव्यात.
6. महिला बचत गट, युवक मंडळ व विविध संस्थांचे पाठिंब्याचे पत्र मिळवुन युक्रांदकडे द्यावे.
7. प्रा. शाळा व माध्यमिक विद्यालये आणि महाविद्यालयातील मुला-मुलींच्या गावात अगर शहरात जनजागृतीसाठी प्रभातफेऱ्या काढाव्यात.मुलामुलींद्वारे मुख्यमंत्र्याना दरमहा एक एक पत्र पाठवावे.
8. युक्रांदतर्फे राज्यात कुठेही संपुर्ण दारुबंदी बाबत आयोजीत होणाऱ्या बैठका, परिषद, धरणॆ आंदोलन व सत्याग्रहाच्या निरनिराळ्या कार्यक्रमात आपण आपल्या सहकाऱ्यांसह सहभागी व्हावे.

9. आपापल्या सर्व लोकप्रतिनिधीना म्हणजेच सरपंच, महापौर, नगराध्यक्ष, नगरसेवक, आमदार, खासदार व मंत्री याना आपली संपुर्ण दारुबंदीबाबतची भूमीका जाहीर करण्याचा आग्रह करत राहावा. या आंदोलनास त्यांचे पाठींब्याचे पत्र मिळवावे.
10. आपण या कार्यासाठी दररोज दोन तास व आठवड्यातील 1 दिवस द्यावा अशी विनंती.

## *शासनाचा दुटप्पीपणा*

केंद्र व राज्य सरकारने 2 ऑक्टोबर 2007 रोजी आम जनतेला परिपत्रक व प्रसिद्धीमाध्यमाद्वारे गांधीवादाची शपथ दिली. त्यात मद्य व नशिले पदार्थाना उत्तेजन देणार नाही असा मजकुर होता.

शासन व्यवस्थेत व्यसनमुक्ती व दारुबंदी करता स्वतंत्र खाते कार्यरत आहे.

म. गांधी तंटामुक्त गाव तसेच आदर्श गाव मोहीम?

मद्य विक्रीचे परवाने देताना महिलाना विचारले जात नाही.मात्र लोककल्याणकारी शासनाकडुन दारुदुकान बंदीकरता 51% महिलांच्या मतदानाची अपेक्षा का?

प्राथमिक व माध्यमीक शिक्षण अभ्यासक्रमात मुल्यशिक्षण हा विषय आहे.

शासनाची महिला व बालकल्याणाची उद्दीष्ट्ये कशी काय साध्य होणार?

## *आपल्या मागण्या*

1. देशी, विदेशी मद्य विक्रीचे (बिअर बार, वाईन शॉप, परमीट रूम, देशी दारु व ताडीचे दुकान व बिअर शॉपी ई.) परवाने देण्याचे त्वरीत बंद करावे.
2. दिलेल्या परवान्याचे वार्षीक नुतनीकरण कायमचे बंद करावे
3. कोणतेही नशिले पदार्थ अगर मद्य उत्पादन व विक्री करण्यावर सध्यापेक्षा कायदेशीर कडक निर्बंध व शिक्षेची तरतुद व्हावी.
4. व्यसनमुक्ती व नशाबंदीचे काम करणाऱ्या संस्थाना आधिक प्रोत्साहन द्यावे.

संपर्कासाठी

विकास लवांडे (9326848175) संयोजक संपुर्णं दारुबंदी आंदोलन, अध्यक्ष पुणे जिल्हा युक्रांद

संयोजन समिती

अन्वर राजन, रविंद्र टकले, श्रीराम टेकाळे, वसुधा सरदार, अमृत बंग, विक्रांत पाटील, प्रसाद चांदेकर, प्रविण नाईक, विपुल पाटील, संदिप गव्हाणे, मिरा डोईफोडे, प्रसन्न मराठे, माधव ताटे, राजेश्री क्षिरसागर, संभाजी चांगभले, रामदास भडंगे, गणेश एचवाड, संदीप पाटील, नाना वांडेकर, राहुल गोरे, गीतांजली जाधव, गोपाळ गुणाले, विष्णु शिंदे, हरिभाउ गायकवाड, युवराज मगदुम, प्रल्हाद शिंदे, संतोष खोपडे, लिंबराज बिराजदार, संदिप बर्वे, पुष्कराज परदेशी